# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १०/०२/२०१७

## महिला सुरक्षितता आणि सामाजिक सलोख्यासाठी ग्रामीण पोलीस दलातर्फे हरसुल मॅरेथॉन २०१८ चे आयोजन

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा** यांचे संकल्पनेतुन महिला सुरक्षा आणि सामाजिक सलोख्यासाठी ग्रामीण पोलीस दलातर्फे **‘‘हरसुल मॅरेथॉन २०१८’’** चे आयोजन करण्यात आले होते. नाशिक जिल्हयातील अतिदुर्गम भागातील आदिवासी आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या **शाळकरी मुलींसाठी** आज रोजी सकाळी हरसुल गावात सदर मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. सदर मॅरेथॉन स्पर्धेकरीता प्रमुख अतिथी म्हणुन **ऑलंम्पिक ॲथलिट व अर्जुन पुरस्कार विजेत्या सन्मा. कविता राऊत (तुंगार)** तसेच कविता राउत फाउंडेशनचे **सी.ई.ओ. श्री. महेश तुंगार** हे उपस्थित होते. हरसुल गावातील तसेच अतिदुर्गम परिसरातील विविध आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळा महविद्यालयातील सुमारे १,००० मुलींनी सदर स्पर्धेत सहभाग नोंदविला होता.

हरसुल, ता.त्रंबकेश्वर येथील ग्रामीण रूग्णालय परिसर येथुन सकाळी सहा वाजेपासुन सदर मॅरेथॉन स्पर्धेला सुरूवात झाली. मुलींसाठी आयोजित केलेल्या ०३ कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेत अदिवासी भागातील विविध शाळकरी मुलींनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. सदर मॅरेथॉन स्पर्धेत वाघेरा आश्रमशाळेची **विद्यार्थीनी कु. अंकिता बांगाड हिने प्रथम क्रमांक** पटकाविला, तर **व्दितीय क्रमांक** नाचलोंढी विद्यालयातील **कु.विद्या भांगरे** हिने पटकाविला. तसेच **तृतीय क्रमांकावर** वाघेरा आश्रम शाळेची विद्यार्थीनी **कु. रविना चौधरी** हिने यश संपादन केले. तसेच उत्तेजनार्थ विजेत्यांमध्ये कु. रोहिणी खेडुलकर, कु.राणी गालट, व कु. सुशिला चौधरी यांनी यश संपादित केले. सदरची मॅरेथॉन स्पर्धा उत्कृष्टरित्या पार पडलेनंतर उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचारी, नागरीक तसेच शालेय विद्यार्थ्यांची ‘‘फण रन’’ स्पर्धा पार पडली.

सदर मॅरेथॉन स्पर्धेच्या बक्षिस वितरण प्रसंगी प्रमुख अतिथी **सन्मा. कविता राऊत (तुंगार),** कविता राउत फाउंडेशनचे **सी.ई.ओ. श्री. महेश तुंगार,** मा.आमदार **श्रीमती निर्मला गावीत,** मा.पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांच्या पत्नी **श्रीमती रोहिणी दराडे**, त्रंबकेश्वरचे तहसिलदार **श्री. महेंद्र पवार**, पंचायत समिती उपसभापती **श्री.रविंद्र भोये** असे मान्यवर उपस्थित होते. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा यांनी उपस्थित मान्यवर, पोलीस अधिकारी व कर्मचारी, तसेच शालेय विद्यार्थी, विद्यार्थीनी व नागरीकांचे आभार मानले. तसेच सदर मॅरेथॉन स्पर्धेत यश संपादन करणा-या विद्यार्थीनींना शुभेच्छा दिल्या. अतिदुर्गम भागातील आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळकरी मुलींच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच महिला सुरक्षितता व सामाजिक सलोखा राखण्यासाठी सदर स्पर्धांचे आयोजन केल्याचे मनोगत मा.पोलीस अधीक्षकांनी व्यक्त केले.

उपस्थित मान्यवर तसेच मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांचे हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरण करण्यात आले. तसेच सदर मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग नोंदविणा-या इतर शाळकरी मुलींनाही प्रमाणापत्र देवुन गौरविण्यात आले.

सदर मॅरेथॉन स्पर्धेसाठी उपस्थित असलेल्या प्रमुख अतिथी **सन्मा. श्रीमती कविता राऊत** यांनी विजेत्या स्पर्धकांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच नाशिक ग्रामीण जिल्हयातील पोलीसांनी खेडेगावांमध्ये आयोजित केलेल्या मॅरेथॉन स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील खेळाडु विद्यार्थ्यांना उत्तेजन व प्रोत्साहन दिल्याबद्दल आभार मानले. सदर स्पर्धेतील शाळकरी मुलींना क्रिडा प्रशिक्षक श्री. भगवान हिरकुड, राष्ट्रीय धावपट्टु कु.वर्षा चौधरी, तसेच ग्रामीण पोलीस दलाचे क्रिडा प्रशिक्षक श्री. समाधान गवळी यांचे मार्गदर्शन लाभले.

हरसुल येथे आयोजित करण्यात आलेल्या सदर मॅरेथॉन स्पर्धेस नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड**, पेठ उपविभागाचे **पोलीस उपअधीक्षक श्री. वळवी**, प्रो.पोलीस अधीक्षक **श्री. ओमक्का सुदर्शन**, हरसुल पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी **श्री. प्रविण साळुंके**, तसेच जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच नामांकित लोक प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरीक, वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील नागरीकांची विशेष उपस्थितीत सदर मॅरेथॉन स्पर्धा पार पडली.